# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २२/०७/२०२२ (शुक्रवार)**

**(दुपार)**

---

### जबरी संभोग

**पो.स्टे. कोंढाळी** :– दिनांक २०/०७/२०२२ चे १३:१५ वा. ते १४.१५ वा. चे सुमारास फिर्यादी या कामावर गेल्या होत्या. त्यादरम्यान आरोपी नामे– निलेश रविंद्र गौरखडे वय २७ वर्ष रा. मसाळा ता.काटोल जि. नागपुर हा फिर्यादीच्या घरी अनाधिकृतपणे प्रवेश करून फिर्यादी यांची मतीमंद मुलगी वय २१ वर्ष ही घरी एकटी असतांना तिच्या एकटेपणाचा व मतिमंदपणाचा फायदा घेवुन तिला कोणतीतरी गोळी खायला देवुन तिच्यावर जबरी संभोग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ४५२,३७६(२)(जे),३७६(२)(इ),५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री अजित कदम मो.नं. ९१११२९८५९२२ हे करीत आहे.

### जबर दुखापत

**पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील श्री गणपती मंदिर परिसर आदासा सावनेर येथे दिनांक २१/७/२२ चे १६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– श्रीमती रत्नमाला सुधाकर कडु वय ४५ वर्ष, रा. वार्ड क्र. ०२ आदासा त कळमेश्वर व आरोपी नामे– संजय बालाजी कडु रा. आदासा वार्ड क्र. ०२ ता कळमेश्वर हे एकमेकाचे नातेवाईक असुन फिर्यादी हि खादय पदार्थाचे दुकान लावत असुन त्या दुकानाचे जागेत फियादीने दोन इसम गड्डे खोदन्याकरीता घेवून गेला. त्यादरम्यान आरोपी हा हजर आला व फिर्यादीला म्हणाला की, 'तु ईथे दुकान लावायची नाही' असे म्हणुन शिवीगाळ केली व फिर्यादीचा उजवा हात मुरगळला व जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३२५, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा प्रकाश नांदुरकर ब न १५५३ मो क्र ८६०५३८१५९० हे करीत आहे.

### विश्वासघात

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत नगपुर ते भंडारा हायवे महालगाव कामठी येथे दिनांक ०५/०४/२०२२ ते दिनांक २१/०७/२०२२ चे १५.१४ वा. सुमारास फिर्यादी नामे– परेश मुकंद वेद, वय ५२ वर्षे रा. कॅनल रोड, रामदास पेठ नागपुर हा स्वेटल कंपनीचा मालक असून आरोपी नामे– स्वप्नील शंकरराव ठाकरे रा. आदर्श कॉलनी रामटेक हा सुपरवायजर पदावर काम करीत आहे. आरोपीने धारीवाल हार्डवेअर कंपनी यांच्याकडील लोहयाचे पायपाचे डीलीव्हरीचे पैसे ३९,१०१/–रू. आपले एच डी एफ सी खात्यात गुगल पे व्दारे बोलावुन ते पैसे स्वता: खर्च करून फिर्यादी व त्याचे कंपनीचा विश्वासघात केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४०८ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक देवेन्द्र भुरे मो.क्र. ७७२२००३३४२ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. जलालखेडा** :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा रोहणा बसस्टॉप जवळ काटोल वरुड येथे दिनांक ११/०७/२२ चे १८.१५ वा. ते १८.३० वा. सुमारास राहुल नथ्थुजी खरपूरीया (मृतक) वय २७ वर्ष, रा. खानगाव त. काटोल जि. नागपूर हा त्याचे एम.एच.४०–ए.बी–६७८३ क्रमांकाच्या मोटरसायकलने भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने अचानक माकड आडवे आल्याने माकडाला धडक दिली. त्यामुळे रोडवर पडल्याने राहुल चे डोक्याला मार लागल्याने तो स्वताचे मरणास कारणीभुत ठरला. त्यास उपचाराकारीता प्रथम मेडीकल कॉलेज नागपूर येथे भरती केले होते. उपचारा दरम्यान दिनांक १९/०७/२०२२ चे ०९.१५ वाजता मरण पावला. त्याचे पी. एम. मेडीकल कॉलेज नागपूर येथे झाले त्याबाबदचे मर्ग क्र ००/२०२२ कलम १७४ सी.आर.पी.सी. चे कागदपत्र प्राप्त झाल्यावर पो.स्टे. दि. ११/०७/२०२२ चे साना क्र ३८/२२ वरुन मृतक याचे सदरचा गुन्हा नोंद करुन तपासात घेतला

सदर प्रकरणी सरतर्फे सहायक फौजदार अनिल जोशी पो.स्टे. जलालखेडा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३०४ (अ) भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार जोशी मो.क्र. ७४९९७६०७२८ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील मौजा ठाणा गावाजवळ येथे दिनांक २१/०७/२२ चे १९.४५ वा. ते २०.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– ऋषीकुमार केवलराम सुपारे वय ३१ वर्ष रा. कोंडाकोसरा ता. पवनी जि. भंडारा यांची बंद पडलेली एम.एच.– ३१/डी.व्ही– १०७३ क्रमांकाची कार हिला एम.एच– ३६/एच– ७१९० क्रमांकाच्या कारला दोराने बांधुन नेत असता गाडीचा दोर ढिला झाल्याने फिर्यादीचा मित्र स्वप्नील धुडसे यास उमरेड कडुन एक एम.एच– ४०/बी.ई– ४८६४ क्रमांकाची लाल रंगाची कारचे चालक आरोपी नामे– ऋषीकुमार केवलराम सुपारे वय ३१ वर्ष रा. कोंडाकोसरा ता. पवनी जि. भंडारा याने आपल्या ताब्यातील वाहन हे भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एम.एच.– ३१/डी.व्ही– १०७३ क्रमांकाच्या कारला धडक दिली. त्यामुळे दोर बांधत असलेला स्वपनील दयाराम धुडसे (मृतक) वय २० वर्ष रा. कोंडा ता. पवनी जि. भंडारा हा जखमी होवुन खाली पडला. त्यास आर्चएंजल हॉस्पीटल उमरेड मध्ये उपचाराकरीता नेले असता स्वप्नील धुडसे यांच्या छातीच्या बरगडया तुटुन फॅक्चर होवुन मरण पावला. यातील एमएच– ४०/ बी.ई– ४८६४ क्रमांकाचा कार चालक आरोपी हा स्वत: तसेच कारमधील बसलेल्या इसमांना जखमी होण्यास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी पो.स्टे. उमरेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३३८, ३०४ (अ), भादंवी, सहक. १८४, १८५ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि राजु डोर्लीकर मो.न. ७५८८२३७७६४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**